असा. क्र. १००

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

270

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, मे २३, २००६ / ज्येष्ठ २, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मे २००६

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक २००६/प्र.क्र. २९२/म-१.—सरकारी रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या संबंधातील कराराचे संलेख किंवा त्यांचा अभिलेख किंवा करार संक्षेप लेख यांवर मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याला जोडलेल्या अनुसूची एक च्या अनुच्छेद ५, खंड (ब) अन्वये आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात आणि शेअर दलालांनी सरकारी रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या संबंधात केलेला व्यवहार अभिलिखित असणाऱ्या संलेखांवर, त्या अनुसूचीच्या अनुच्छेद ५१ (अ), खंड (अ) अन्वये, आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क संपूर्णतः माफ करणे लोकहितास्तव आवश्यक आहे, याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे ते मुद्रांक शुल्क माफ करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 23rd May 2006.

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank 2006/C.R. 292/M-1.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby remits the stamp duty, in the whole, chargeable on the instruments of agreement or its records or memorandum of an agreement relating to purchase or sale of a Government security under clause (*b*) of article 5 and on the instruments of record of transactions relating to sale and purchase of Government securities by a trading members under clause (a) of article 51A of the Schedule I appended to the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. TAYADE,
Under Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई